सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.३५३ ठ. क्र.३२०
दि. २०।२।१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मा.म.न.पा.ठ.क्र. २०६ दि. २०-०२-२०१४ ने नियुक्त करण्यात आलेल्या प्रस्तावात नमूद मा.स्थायी समितीचे ८ (आठ) सदस्य हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २० (३) नुसार दि. १ मार्च २०१६ रोजी दुपार पासून निवृत्त होणार आहेत. या निवृत्त होणा-या ८ (आठ) सदस्यांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २० (५) अन्वये नवीन ८ (आठ) सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्ती करणेसाठी मा.आयुक्त यांचे दि. ३-२-२०१६ चे टिपणीने आलेले प्रकरण.

**टीप :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ३१-अ चे तरतुदीनुसार मान्यताप्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलनीक संख्या बळानुसार नेमणूक मा.महानगरपालिकेने करण्याचे आहे. ही नेमणूक करताना सभागृहनेता, विरोधी पक्षनेता, आणि अशा पक्षाचे व गटाचे नेत्यांच्या सल्ल्यानुसार तसेच नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील परिपत्रक क्र.संकीर्ण/२०१०/प्र.क्र./०८५/नवि-३२ दि. ६ जुलै २०१० च्या परिपत्रकानुसार महानगरपालिकेच्या स्थायी समितीसह विविध समित्यांवर सदस्य नामनिर्देशीत करताना अनुसरावयाची कार्यपध्दतीनुसार कार्यवाही ठेवावी लागणार आहे. मा.शासनाच्या उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार ही कार्यवाही करणेची आहे.

प्रस्तुत आलेल्या विषयाचे अवलोकन केले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३१-अ चे तरतूदीनुसार आणि कलम २० (५) अन्वये मा. स्थायी समितीचे ८ (आठ) सदस्य पदी पुढील प्रमाणे नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

१) मा. फुलारे श्रीदेवी जॉन
२) मा. येमूल मेघनाथ दत्तात्रय
३) मा. शिकलगर बिस्मिल्ला अल्लाबक्ष
४) मा. रोटे सुनिता दादाराव
५) मा. बत्तुल शशिकला नारायण
६) मा. यन्नम श्रीकांचना रमेश
७) मा. गडवालकर नरसुबाई नागनाथ
८) मा. म्हेत्रे भिमाशंकर बाबूराव

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.३५४ ठ. क्र.३२२
दि. २०/२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मा.म.न.पा.ठराव क्र. २०७ दि. २०-२-२०१४ नुसार व मा. परिवहन समिती ठ.क्र. १२७, दि. १-२-२०१४ ने पारित झालेल्या ठरावामधील प्रस्तावात नमूद मा.परिवहन समितीचे ६ (सहा) सदस्य दि. १-३-२०१६ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २५ (६) नुसार या समितीचे सदस्यांचा सदस्य पदावर जास्तीत जास्त कालावधी झाला असल्याने ते निवृत्त होत आहेत. या निवृत्तीमुळे रिक्त होणा-या मा.परिवहन समितीचे ६ (सहा) सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्ती करणेसाठी मा.आयुक्त यांचे दि. ३-२-२०१६ चे टिपणीने आलेले प्रकरण.

**टीप :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ३१-अ चे तरतुदीनुसार मान्यताप्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलनीक संख्या बळानुसार नेमणूक मा.महानगरपालिकेने करण्याचे आहे. ही नेमणूक करताना सभागृहनेता, विरोधी पक्षनेता, आणि अशा पक्षाचे व गटाचे नेत्यांच्या सल्ल्यानुसार तसेच नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील परिपत्रक क्र.संकीर्ण/२०१०/प्र.क्र./०८५/नवि-३२ दि. ६ जुलै २०१० च्या परिपत्रकानुसार महानगरपालिकेच्या स्थायी समितीसह विविध समित्यांवर सदस्य नामनिर्देशीत करताना अनुसरावयाची कार्यपध्दतीनुसार कार्यवाही ठेवावी लागणार आहे. मा.शासनाच्या उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार ही कार्यवाही करणेची आहे.

प्रस्तुत आलेल्या विषयाचे अवलोकन केले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३१-अ चे तरतूदीनुसार आणि कलम २५ (७) अन्वये मा. परिवहन समितीचे ६ (सहा) सदस्य पदी पुढील प्रमाणे नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

१) मा. शिवाजी शंकर मगरुमखाने
२) मा. रविसिंग राणूसिंग बु-हाणपूरे
३) मा. शब्बीर इसाम पटेल
४) मा. राजन शंकरराव जाधव
५) मा. शंकर मुकुंद बंडगर
६) मा. शंभय्या शंकरय्या वडलाकोंडा

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब/मामुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ९९५ ठ. क्र. ३२२
दि. २०/२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



अखिल भारतीय मराठी नाटय परिषद मुंबई या मध्यवर्ती समिती तर्फे बालनाटय संमेलन भरविण्याची कल्पना पुढे आली मोठयाच्या नाटय संमेलनाप्रमाणेच बालगोपाळांचे बालनाटय संमेलन भरविल्यास बालनाटय चळवळीला उर्जीतावस्ता प्राप्त होऊन गती मिळेल हे महाराष्ट्रातील नाटयसमिक्षक अभ्यासकांचे मत शिरोधार्ह मानून संमेलनाचा घाट घालण्याचा निर्णय झाला. प्रतिवर्षी वेगवेगळया ठिकाणी हे संमेलन होणार आहे. त्यामुळे पहिले बालनाटय संमेलन भरविण्याची मागणी राज्यातील ८ ते ९ प्रमुख शहरामधून करण्यात आली होती. त्यातून मध्यवर्ती समितीने अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेचा सोलापूर उपनगरीय या शाखेच्या मागणीला प्राधान्यक्रम देत प्रथम पसंती दिली. अन् हे बालनाटय संमेलन भरविण्याचा पहिला मान सोलापूर नाटय परिषदेच्या उपनगरीय शाखेला मिळाला. सोलापूरकर म्हणून आम्हाला याचा सार्थ अभिमान वाटतो. बालनाटय संमेलन भरविण्याचा पहिला मान सोलापूरला मिळाला याचे सर्व शहरवासियांनी सर्व राजकिय पक्ष व शैक्षणिक संस्था, रंगकर्मी, व्यापारी वर्ग, उच्चविद्याविभूषित वर्गाने सोलापूर महानगरपालिकेने सहर्ष स्वागत केले आहे.

उत्साहाने सर्व शहर संमेलनाच्या तयारीला लागले आहे. सोलापूर हे आपल्यासाठी नवे नाही इथली परंपरा, संस्कृतिक घडामोडी व सोलापूरशी घट्ट नाळ जुळलेली आहे. म्हणून तीन दिवस चालणा-या या संमेलनाचे आम्ही सहर्ष स्वागत करीत आहोत म्हणून अखिल भारतीय मराठी नाटय परिषद मुंबई आयोजित सोलापूर येथे दि.२७ त २९ नोव्हेंबर २०१५ कालवधीत आयोजित करण्यात आले होते.

तसेच महाराष्ट्रात सोलापूर शहरात प्रथमच अखिल भारतीय उर्दू नाटय संमेलन दि.२५/१२/२०१५ ते २८/१२/२०१५ पर्यंत आयोजित करण्यात आले होते. या संमेलनामध्ये देशभरातील नाटय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहिले असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नाटके सादर करण्यात आली आहेत.

वरीलप्रमाणे मराठी बालनाटय संमेलन व उर्दू नाटय संमेलनाचे कामाकरिता सोलापूर येथील हुतात्मा स्मृती मंदिर विनामुल्य देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच या दोन्ही संमेलनाकरिता हुतात्मा स्मृती मंदिर लगत असलेल्या नाटय कलाकारांना राहणेसाठी देण्यांत आलेल्या खोल्याचे भाडेही माफ करण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.४१६ ठ. क्र. 323
दि. 20/5/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील ग्राहकांना चांगल्या व उच्च प्रतीचा आंबा थेट शेतक-यांमार्फत उपलब्ध व्हावा यासाठी सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समिती दिनांक ०५/०५/२०१६ ते दिनांक ०९/०५/२०१६ या कालावधीत आंबा महोत्सव आयोजित करणार आहे. सदरचा आंबा महोत्सव सोलापूर महानगरपालिकेच्या होम मैदानावर आयोजित करण्याचा मानस आहे. त्यामुळे सोलापूर शहरातील ग्राहकांना चांगल्या प्रतीचा आंबा उपलब्ध होईल. तसेच सदरच्या आंबा महोत्सवातून आंबा थेट शेतक-यामार्फत ग्राहकांना उपलब्ध होणार असल्याने त्यातून शेतक-यांना फायदा होणार आहे.

सदरच्या आंबा महोत्सवासाच्या माध्यमातून सोलापूर बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील ग्राहकांना व शेतक-यांना फायदा होणार असल्याने सदरच्या आंबा महोत्सवासाठी सोलापूर महानगरपालिकेची हरीभाई देवकरण शाळेसमोरील होम मैदानाची पन्नास हजार चौरसफुट जागा दिनांक ०५/०५/२०१६ ते दिनांक ०९/०५/२०१६ या कालावधीत सोलापूर बाजार समितीस आंबा महोत्सवासाठी नाममात्र प्रतिदिनी रु. १०००/- प्रमाणे भाडे आकारुन वरील नमुद कालावधीसाठी देण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 359 ठ. क्र. 328
दि. 20/2/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



शहरातील व शहर हद्दवाढ भागातील मिळकतीच्या २०१५-१६ सालाच्या आकारणी बाबत प्रस्तावात नमूद सविस्तर माहिती असून,प्रस्तावातील दरसूची ही निवासी,वाणिज्य व औद्योगिक या खाजगी मिळकत धारकासाठी विचारात घ्यावयाचे असून, याव्यतिरिक्त १) सोलापूर महानगरपालिका हद्दीतील, शासकीय, निमशासकीय, दवाखाना, हॉस्टेल, लॉज, पेट्रोलपंप, सिनेमा थिएटर, नाटयगृह, मंगल कार्यालय, सांस्कृतिक, शैक्षणिक इमारत, इत्यादी तत्सम इमारतीसाठी मुल्यांकन पध्दतीनुसार मा.सहा.संचालक नगर रचना, सो.म.न.पा.यांचेकडून मिळकती निहाय मुल्य दर निश्चित करणे आवश्यक ठरते, २) त्याचप्रमाणे विनापरवाना बांधकामाची आकारणी ३) भाडेकरारात भाडयाव्यतिरिक्त टॅक्स भरण्याबाबतही करार झालेला असल्यास ४) मिळकत हस्तांतरणात करण्यात येणारी कर आकारणी ५) तसेच मिळकतीच्या वापरातील बदलानंतर करावयाची कर आकारणी याबाबतही आदेश होणेस,तसेच मा.नगररचनाकार यांनील सादर केलेल्या अहवालानुसार कर आकारणीकामी दर निश्चित कर करणेस,त्याचप्रमाणे मा.नगररचनाकार यांनी सादर केलेल्या प्रारुप दरसुचीसही, त्याचप्रमाणे एखाद्या मिळकतीचे करपात्र मुल्य निश्चित केल्यानंतर त्यावर आकारण्यात येणा-या कराची टक्केवारी (Slab) प्रस्तावात नमूद प्रमाणे निश्चित होऊन मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक १९/११/२०१४ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी शहरातील व शहर हद्दवाढ भागातील मिळकतदारांच्या हिताचा विचार होऊन आणि महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून मिळकतीच्या सन २०१५-१६ च्या आकारणीबाबत मा.सर्वसाधारण सभेने धोरणात्मक निर्णय घेणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ५७३, दिनांक ७-१-२०१५ चे शिफारशीने आलेल्या प्रकरणी मा.म.न.पा.ठराव क्र. ३८, दि. १३-४-१५ अन्वये समिती गठीत करणेत आले असून, सदर समितीची दिनांक ५-२-१६ रोजीच्या बैठकीमध्ये निर्णय होवून सदरचा निर्णय मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर करणेकामी दि.११/२/२०१६ चे शिफारशीने आलेला अहवालाचे अवलोकन केले.

सबब मा.म.न.पा.ठराव क्र. ३०३, दिनांक १८-२-२०१६ अन्वये झालेल्या ठरावानुसार कार्यवाही ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका